EAU/ICD/2017-18/221
07/12/2017

मसुदा
क्र. ४/२०१७-१८

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा *मंगळवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता* सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते:-

१. डॉ. देवानंद शिंदे - (प्रभारी कुलगुरू) (अध्यक्ष)
२. डॉ. विष्णू मगरे - (प्रभारी प्र-कुलगुरू)
३. डॉ. दिनेश कांबळे - (प्रभारी कुलसचिव) (सदस्य सचिव )
४. डॉ. रोहीदास काळे - (सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग)
५. डॉ. मुरलीधर कु-हाडे - (सदस्य)
६. प्रा.डॉ. गौतम गवळी -- (सदस्य)

श्री. विजय फ. तायडे, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी आणि डॉ. अर्जुन घाटुळे, स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन हे निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

➢ **स्वागत व अभिनंदन**

कुलसचिवांनी सांगितले की, मा. कुलपतींच्या आदेशानुसार नविन व्यवस्थापन परिषदेची स्थापना झालेली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम (३०)(४)(b) नुसार प्रभारी प्र-कुलगुरू म्हणून डॉ. व्ही. एन. मगरे यांची व कलम (३०)(४)(d) नुसार प्राचार्य डॉ. एम.एस. कु-हाडे व प्रा. डॉ. रश्मी ओझा यांची अधिष्ठाते म्हणून नेमणुक करण्यात आली आहे. तसेच कलम (३०)(४)(e) नुसार प्रा. डॉ. गौतम गवळी यांची विभाग प्रमुख म्हणून व्यवस्थापन परिषदेवर नेमणुक झाल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात आले व कुलगुंरूच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत करण्यात आले.

डॉ. व्ही. एन. मगरे, प्राचार्य डॉ. एम.एस. कु-हाडे व प्रा. डॉ. गौतम गवळी यांच्यासारखे विद्वान, व्यांसगी आणि ज्ञानी लोक आपल्याला मिळालेले आहेत त्यामुळे व्यवस्थापन परिषदेत आपल्याला त्यांच्या ज्ञानाचा चांगला फायदा होईल अशी मला खात्री आहे असे सांगून त्या तिघांचेही डॉ. रोहीदास काळे यांनी मनपुर्वक स्वागत केले.

➢ अनुपस्थिती :-

सभेला सुरूवात करताना कुलसचिवानी सांगितले की प्रा. (डॉ.) रश्मी ओझा या सभेस उपस्थित राहू शकणार नसल्याने त्यांना या सभेत अनुपस्थित राहण्यास परवानगी द्यावी.

यावर व्यवस्थापन परिषदेने प्रा. (डॉ.) रश्मी ओझा यांची या सभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य केली.

➢ श्रध्दांजली

**श्री. पां.तु. पाटणकर**

जेष्ठ नाटककार श्री. पां. तु. पाटणकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

**श्री. राम तांबे**

जेष्ठ समाजवादी कार्यकर्ते श्री. राम तांबे यांचे वृध्दापकाळाने दिनांक २४ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

**श्री. के.पी. मेढेकर**

राज्याचे माजी पोलीस महासंचालक श्री. के.पी. मेढेकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते.

**श्री. अरूण साधू**

जेष्ठ साहित्यिक, पत्रकार श्री. अरूण साधू यांचे वृध्दापकाळाने दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते.

**श्री. दादा गावकर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ स्वयंसेवक श्री. दादा गावकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

**श्री. राम तांबे**

जेष्ठ समाजवादी कार्यकर्ते श्री. राम तांबे यांचे वृध्दापकाळाने दिनांक २४ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

**श्री. डुंगरशी गाला**

नवनीत या प्रसिध्द प्रकाशन संस्थेचे संस्थापक श्री. डुंगरशी गाला यांचे वृध्दापकाळाने दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

**श्री. टॉम अल्टर**

बॉलिवूडमधील संवेदनशील अभिनेते व लेखक श्री. टॉम अल्टर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

### श्री. रमेश उदारे

जेष्ठ पत्रकार, नाटयसमीक्षक व लेखक श्री. रमेशे उदारे यांचे हदयविकाराने दिनांक १ ऑक्टोंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

### श्री. ह. मो. मराठे

जेष्ठ साहित्यिक, पत्रकार श्री. ह. मो. मराठे यांचे अल्पशा आजाराने दिनांक २ ऑक्टोंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

### श्री. योगीराज गोविंद खोंडे

महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री. योगीराज गोविद खोंडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ६ ऑक्टोंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते.

### डॉ. मुरलीधर बन्सीलाल शहा

गांधीवादी विचारवंत व जेष्ठ साहित्यिक डॉ. मुरलीधर बन्सीलाल शहा यांचे अल्पशा आजाराने दिनांक ८ ऑक्टोंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते.

### श्रीमती. गिरिजा देवी

प्रख्यात शास्त्रीय गायिका तथा ठुमरीसम्राज्ञी श्रीमती. गिरिजा देवी यांचे हदयविकाराने दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१७ रोजी निधन झाले.

### श्री. पांडुरंग पेम

जेष्ठ लेखक, नाटककार श्री. पांडुरंग पेम यांचे हदयविकाराने दिनांक २६ ऑक्टोंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.

### श्रीमती. पद्मश्री बेगम

प्रख्यात समाजसेविका लेखिका श्रीमती. पद्मश्री बेगम यांचे अल्पशा आजाराने दिनांक २ नोव्हेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षांच्या होत्या.

### श्री. सोमनाथ पाटील

जेष्ठ पत्रकार श्री. सोमनाथ पाटील यांचे अल्पशा आजाराने दिनांक १२ नोव्हेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६२ वर्षांचे होते.

### श्रीमती. श्यामा ऊर्फ खुर्शीद अख्तर

जेष्ठ अभिनेत्री श्रीमती. श्यामा ऊर्फ खुर्शीद अख्तर यांचे वृध्दापकाळाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षांच्या होत्या.

### श्रीमती. हौसाआई आठवले

रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्या मातोश्री श्रीमती. हौसाआई आठवले यांचे वृध्दापकाळाने दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८३ वर्षांच्या होत्या.

**श्री. ल. टिळक**

मोडी लिपीचे प्रसारक, जेष्ठ लेखक आणि साहित्यरसिक श्री.ल. टिळक यांचे अल्पशा आजाराने दिनांक २५ नोव्हेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

**श्री. नारायणराव बोडस**

जेष्ठ गायक आणि संगीत रंगभूमीवरील अभिनेते श्री. नारायणराव बोडस यांचे दिर्घ आजाराने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही श्रंध्दाजली वाहण्यात आली.

**बाब १: दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

**ठराव:** असा ठराव करण्यात आला की, दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात यावे.

**बाब २: दिनांक १७ जून, २०१७, १ जुलै, २०१७, ७ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेचा कार्यवाही अहवाल सादर.**

**ठराव:** असा ठराव करण्यात आला की, दिनांक १७ जून, २०१७, १ जुलै, २०१७, ७ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या सभेच्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात यावी.

**बाब ३: विद्वत परिषद दिनांक ३० जुलै, २०१७ च्या बाब क्र. २.१, २.२, ३.३, ३.४, ३.५, ३.६, ४.७, ४.८, ४.१०, ४.११, ४.२१, ४.२२, ४.२३, ४.२९, ४.३१, ४.३२, ४.३४, ७.२ वर पारित झालेले ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.** ✓AAU

**ठराव:** असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषद दिनांक ३० जुलै, २०१७ च्या बाब क्र. २.१, २.२, ३.३, ३.४, ३.५, ३.६, ४.७, ४.८, ४.१०, ४.११, ४.२१, ४.२२, ४.२३, ४.२९, ४.३१, ४.३२, ४.३४, ७.२ या बाबींवर केलेल्या शिफारशी स्विकारण्यात याव्यात.

**बाब ४: विद्वत परिषद दिनांक ८ ऑगस्ट २०१७ च्या बाब क्र. ३.१३, ३.१५, ३.१६, ३.१७, ४.३ वर पारित झालेले ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.** ✓ AAU

**ठराव:** कुलसचिवांनी सांगितले की, वरील बाब क्र. ३ मधील विद्वत परिषदेच्या बाब क्र. ३.१५, ३.१६, ३.१७ चा समावेश झाला असल्याने सदर बाबी वगळण्यात याव्यात; त्यास परिषदेने मान्यता दिली.

असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषद दिनांक दिनांक ८ ऑगस्ट २०१७ च्या बाब क्र. ३.१३, ४.३ अन्वये केलेल्या शिफारशी स्विकारण्यात याव्यात.

बाब ५: **विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त होणारे शिक्षकेत्तर कर्मचारी/अधिकारी, स्वेच्छानिवृत्ती घेणारे कर्मचारी, सेवेत असताना आकस्मित मृत्यू झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना ५ ग्रॅम सोन्याचे वळे पुढील पाच वर्षासाठी सुरू ठेऊन, यासाठी होणा-या खर्चाची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये वित्तीय तरतूद करण्याची बाब.** ✓ (II/IV) Estab. GAD

ठराव: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त होणारे शिक्षकेत्तर कर्मचारी/अधिकारी, स्वेच्छानिवृत्ती घेणारे कर्मचारी यांचे सेवेत असतांना आकस्मित मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना ५ ग्रॅम सोन्याचे वळे पुढील पाच वर्षासाठी सुरू ठेऊन, यासाठी होणा-या खर्चाची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये वित्तीय तरतूद करण्यात यावी.

बाब ६: **The matter of permanent job to be given in University of Mumbai to one person of each family of eleven families who have donated their 13.4 acre lands for construction of model college of University of Mumbai at Ambadave, Tal- Mandangad, Dist- Ratnagiri.** ✓ Estab (I/III)

ठराव: असा ठराव करण्यात आला की, ११ कुटुबांनी मुंबई विद्यापीठाला मॉडेल कॉलेज साठी जी जमिन दान केली त्यापैकी प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीस त्याची अर्हता / पात्रता विचारात घेऊन कायमस्वरूपी वर्ग ३ किंवा ४ संवर्गात नोकरी देणे बाबत तत्वत: मान्यता देण्यात यावी.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, देणगीदार कुटुंबांच्या जमीनीची कागदपत्र, ज्या व्यक्तीस नोकरी दयावयाची आहे त्याची अर्हता/पात्रता/पद, कौटुंबिक स्थिती याबाबत शासनाच्या नियमांचा अभ्यास करुन प्रत्येक कुटुंबातील एका पात्र व्यक्तीची शिफारस करण्यासाठी खालिलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी :-

१. डॉ. मुरलीधर कु-हाडे
२. प्रा. (डॉ.) गौतम गवळी
३. प्रा. (डॉ.) जी. बी. राजे
४. उपकुलसचिव (आस्थापना विभाग)

बाब ७: **श्री. सुनिल गोपाळ दास, शिपाई, मानसशास्त्र विभाग यांचे दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी अपघातात निधन झाल्याने त्यांच्या जागी अनुकंपा तत्वावर (दोन पेक्षा जास्त अपत्य असल्याने) त्यांचा मुलगा कु. आशिष सुनिल दास विद्यापीठ आस्थापनेवर नोकरी देण्याबाबत.** ✓ Estab (I/III)

ठराव: असा ठराव करण्यात आला की, श्री. सुनिल गोपाळ दास, शिपाई, मानसशास्त्र विभाग यांचे दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी अपघातात निधन झाल्याने त्यांच्या जागी अनुकंपा तत्वावर (दोन पेक्षा जास्त अपत्य असल्याने) त्यांचा

मुलगा कु. आशिष सुनिल दास यांना विद्यापीठ आस्थापनेवर नोकरी देण्याबाबत शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

१. डॉ. मुरलीधर कु-हाडे
२. डॉ. रोहीदास काळे (सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग)
३. उपकुलसचिव, आस्थापना विभाग

श्री. दास यांना दोन पेक्षा जास्त अपत्य असल्याने अनुकंपा तत्वावर नोकरी देणे संबंधी शासनाच्या धोरणाचा अभ्यास करुन समितीने अहवाल सादर करावा.

**बाब ८:** **Appointment of temporary staff (those who are in court cases against Universtiy and those who are not in court) whose period of temporary appointment is completing on 30th December, 2017.**

Estab (I/III)

**ठराव:** असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील परिक्षा विभागासह अन्य विभागामध्ये मनुष्यबळाची गरज लक्षात घेता त्यांची सेवा खंडित करून पुन्हा अस्थायी कर्मचा-यांची नव्याने ३ महिन्याकरिता नियुक्ती करण्यात यावी.

तात्पुरत्या सेवेतील कर्मचारी अनेक वर्षापासून विद्यापीठाच्या सेवेत असल्याने त्यांचा सरळ सेवेच्या भरतीमध्ये सहानभुतीपूर्वक विचार करण्यात यावा, असे मत सदस्यांनी व्यक्त केले.

असा ही ठराव करण्यात आला की, शासनाने अनुदानित व विना अनुदानित पदांचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या टास्क फोर्सचा अहवाल विद्यापीठास नुकताच प्राप्त झाला असल्याने त्याचा अभ्यास प्रशासकीय स्तरावर करुन सर्व संबंधित घटकांशी चर्चा करण्यात यावी व व्यवस्थापन परिषदेतेस अहवाल सादर करण्यात यावा.

शासनाच्या धोरणानुसार व सदर अहवालानुसार अनुदानित पदांवरील कर्मचा-यांना विनाअनुदानीत विभागातून त्वरीत अनुदानीत विभागात बदली करण्याचे धोरण विद्यापीठाने स्विकारले असल्याने, आय.डी.ओ.एल., जे.बी.आय.एम.एस., अल्केश दिनेश मोदी संस्था यासारख्या महत्वांच्या संस्थांसह अनेक विनाअनुदानीत विभागात शिक्षकेत्तर कर्मचारी नसल्याने खूप अडचणी येत असल्याचे निर्देशनास आणण्यात आले. जर या विभागांना पुरेसे मुनष्यबळ त्वरीत दिले नाही तर अनेक प्रशासकीय अडचणी निर्माण होतील, असे मत सदस्यांनी व्यक्त केले.

याबाबत असा ठराव करण्यात आला की, आय.डी.ओ.एल., जे.बी.आय.एम.एस., अल्केश दिनेश मोदी संस्था यासारख्या विनाअनुदानीत संस्थांमध्ये/विभागामध्ये मंजूर असलेल्या विनाअनुदानीत पदांवर प्रचलीत

नियमांनुसार पदोन्नती देणेबाबात व तसेच सरळसेवेने पदे भरणेबाबत तातडीने धोरण ठरविण्यासाठी समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरुंना देण्यात यावेत.

तात्पुरत्या कर्मचा-यांना विद्यापीठातर्फे थेट नेमणुका दिल्याने उद्‌भवलेले कायदेशिर व अन्य प्रश्न विचारात घेता असा ठराव करण्यात आला की, टप्पा-टप्पाने या कामासाठी त्वरीत एजन्सीची नेमणुक करुन आऊट सोर्स करण्यात यावे.

**बाब ९: Approval for creation of Teaching Posts at University of Mumbai Law Academy (UMLA)** UMLA ~~Estab~~ APD TAAS

**ठराव:** असा ठराव करण्यात आला की, बार काऊंन्सीलच्या अटी, आकृतीबंध विचारात घेऊन युनिवर्सिटी ऑफ मुंबई लॉ ॲकेडमी (सेल्फसपोर्टीग) करिता विद्वत परिषेदेच्या दि. ११ ऑक्टोंबर, २०१७ रोजी झालेल्या सभेत बाब क्रं. ७.५ नुसार पारीत झालेला ठराव स्विकारण्यात यावा.
असाही ठराव करण्यात आला की, या ॲकेडमीतील शिक्षकांची पदे सध्या ११ महिन्यांकरीता हंगामी स्वरूपात भरण्यात यावीत.
याबाबत असाही ठराव करण्यात आला की, सदर बाब अधिष्ठाता मंडळापुढे देखील ठेवण्यात यावी.

**बाब १०: Approval for creation of non-teaching Posts at University of Mumbai Law Academy (UMLA)** UMLA Estab F&A.

**ठराव:** असा ठराव करण्यात आला की, कामाची निकड लक्षात घेता हंगामी स्वरुपात पदे भरण्यास मान्यता देण्यात यावी व सध्या विद्यापीठातील इतर हंगामी कर्मचा-यांप्रमाणेच ३ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात नेमणुका करण्यात याव्यात.
असा ठराव करण्यात आला की, विनाअनुदानीत तत्वांवर पदे निर्माण करण्यास तत्वत: मान्यता देण्यात यावी व त्यासाठी वित्त व लेखा समिती समोर बाब ठेवण्यात यावी.

**बाब ११: Remuneration increment of visiting faculty at Confucius Institute University of Mumbai.**

**ठराव:** बाब पुढील व्यवस्थापन परिषदेत ठेवण्यात यावी.

**बाब १२: सर्व विद्याशाखांतील संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांना वार्षीक क्रीडा योगदान (Annual Sports Contribution) ठरविणे बाबत.**

**ठराव:** बाब पुढील व्यवस्थापन परिषदेत ठेवण्यात यावी.

बाब १३: मुंबई विद्यापीठाच्या अकॅडमी ऑफ थिएटर आर्टस् या विभागाच्या 'रंगमंडळ' स्थापनेस मान्यतेबाबत. (व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १७ मे, २०१७ रोजीच्या सभेतील बाब क्र.६२ नुसार).

ठराव: बाब पुढील व्यवस्थापन परिषदेत ठेवण्यात यावी.

बाब १४: **Item for the financial assistance to the M.A. (Economics) needy students of the Mumbai School of Economics & Public Policy (MSE-PP).**

ठराव: बाब पुढील व्यवस्थापन परिषदेत ठेवण्यात यावी.

बाब १५: विधि विद्या शाखेतील पदवी अभ्यासक्रम चालविण्याऱ्या महाविद्यालयांनी एप्रिल, २०१५ च्या परिक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर **Practical Training** या विषयांचे गुण विद्यापीठास सादर केल्यामुळे निकाल जाहिर करण्यास होणाऱ्या विलंबाबाबत संबंधीत महाविद्यालयांवर परीक्षा मंडळाने दिनांक ४ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारसीप्रमाणे दंडात्मक कारवाई सुचविण्याबाबत.

ठराव: बाब पुढील व्यवस्थापन परिषदेत ठेवण्यात यावी.

बाब १६: शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता नविन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, वास्तुशास्त्र) सुरू करण्याकरिता इच्छूक संस्थानांकडून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार प्राप्त झालेले प्रस्ताव. AFF.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता नविन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, वास्तुशास्त्र) सुरू करण्याकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर शासन निर्णय एन.जी.सी. - २०१७/(२९/१७) मशि-४ दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ नुसार कार्यवाही करून छाननी, पुर्नछाननी, तज्ञ समिती, अधिष्ठाता मंडळ व कुलगुरूंचे अंतिम निर्णय विचारात घेऊन व्यवस्थापन परिषदने ३६ संस्थाच्या प्रस्तावित महाविद्यालयांचे पात्र प्रस्ताव व १ संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयाचा प्रस्ताव अपात्र करून, (प्रपत्र-अ प्रमाणे) केवळ पात्र प्रस्ताव सकारात्मक शिफारशीसह शासनाकडे सादर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**बाब १७: सहयोग प्रतिष्ठाण शिक्षण संस्थेचे ज्ञानमूर्ती विद्यालय, दुगदिवी, अंबरनाथ, ठाणे, हे महाविद्यालय स्थंलातरित करण्याबाबत स्थानीक चौकशी समितीचा अहवाल विचारार्थ सादर.** AFF

ठराव: असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम ११८ नुसार व्यवस्थापन परिषदेला निर्णय घेण्याकरिता खालील समिती गठीत करण्यात यावी व समितीने कलम ११८ नुसार अभ्यास करुन अहवाल त्वरीत सादर करावा :-

१. प्रा.(डॉ.) गौतम गवळी (निमंत्रक)
२. प्रा. रवि देशमुख
३. डॉ. अभिनया रमेश

**बाब १८: हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, मु. महाड़, जि.–रायगड हे महाविद्यालय स्थलांतरीत करण्याबाबत, स्थानिक चौकशी समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १७ जुन, २०१७ रोजी झालेल्या सभेच्या (बाब क्र. ६) ठरावानुसार पुनश्च सादर.** AFF

ठराव: असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम ११८ (२) नुसार व्यवस्थापन परिषदेला निर्णय घेण्याकरिता खालील समिती गठीत करण्यात यावी व समितीने कलम ११८ नुसार अभ्यास करुन अहवाल त्वरीत सादर करावा.

१. प्रा.(डॉ.) ~~डॉ.~~ मुरलीधर कु-हाडे (निमंत्रक)
२. प्रा. एम. आर. मेश्राम
३. डॉ. ~~विद्या~~ कुलकर्णी
संध्या

**बाब १९: Report of the Internal Complaints Committee on the complaint of Ms. Harshali Khandare against Dr. Mahendra Bhavre.**

ठराव: बाब पुढील व्यवस्थापन परिषदेत ठेवण्यात यावी.

**बाब २०: Hearing to Dr. Satish.V. Ratnaparkhi**

**Report of the Auditor and representation of Dr. Satish. V. Ratnaparkhi along with explanation and various complaints against Dr. Satish.V. Ratnaparkhi - ADMIFMS (As per the Management Council Resolution vide item No. 15 dated 17th June, 2017)**

**&**

**Report of the committee consisting of Dr. V. Page, Dr. Kavita Laghate and Dr. Smita Shukla in the matter of Ph.D. Admission Result of October/November 2014 of ADMIFMS (As per resolution on Item No.25 of Management Council Meeting dated 1st July, 2017)**

TAAS (UT)

ठरावः असा ठराव करण्यात आला की, डॉ. सतिश रत्नपारखी यांचे म्हणणे एकूण घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने खालीलप्रमाणे पाच सदस्य समिती गठीत करण्यात यावी :-

१. डॉ. विष्णू मगरे (निमंत्रक)
२. डॉ. दिनेश कांबळे (सदस्य)
३. डॉ. रोहीदास काळे (सदस्य)
४. प्रा.डॉ. गौतम गवळी (सदस्य)
५. श्री. विजय फ. तायडे (सदस्य)

समितीने डॉ. रत्नपारखी यांना बोलावून त्यांचे म्हणने ऐकुन घ्यावे व पंधरा दिवसात अहवाल सादर करावा. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर या बाबीवर व्यवस्थापन परिषदेतर्फे निर्णय घेण्यात यावा.

**बाब २१: किशिनचंद चेलाराम कॉलेज, चर्चगेट या महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांच्या मुलाखती घेणेसाठी निवड समितीची बैठक १५ दिवसांच्या आत घेतल्याने ८ दिवस क्षमापीत करून सहायक प्राध्यापकांना मान्यता देण्याबाबत.**

ठरावः बाब पुढच्या व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावी.

**बाब २२: श्री सुजित कुमार यांनी गुरू नानक खालसा महाविद्यालयातील शिक्षकांच्या नियुक्ती तसेच वयोवाढीच्या प्रस्तावासंदर्भात तक्रारी बाबत प्राचार्य (डॉ.) एस. टी. गडदे - अध्यक्ष, प्राचार्य (डॉ.) मारोती भगत-सदस्य, श्री सुनिल मंत्री-सदस्य) या त्रिसदस्यीय समितीने दिलेला अहवाल विचारार्थ सादर.**

ठरावः बाब पुढच्या व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावी.

**बाब २३: डॉ. प्रेम सागर विवेक यांना विद्यापीठ स्तरावर सेवानिवृत्तीचे आर्थिक लाभ व निवृत्ती वेतन "कर्मचारी निवृत्ती वेतन व निवृत्ती वेतन लाभ फंड" मधुन मिळणेबाबत.**

ठराव: असा ठराव करण्यात आला की, डॉ. प्रेम सागर विवेक यांना विद्यापीठ स्तरावर सेवानिवृत्तीचे आर्थिक लाभ व निवृत्ती वेतन "कर्मचारी निवृत्ती वेतन व निवृत्ती वेतन लाभ फंड" मधुन मिळणेबाबत विद्यापीठ परिपत्रक क्रं. AD/Gr.V/PRBS/GSPS/240/of 97 दि. ११ जुलै, ~~१९९७~~ १९९७ व शासनाच्या प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**बाब २४: युसीजीच्या तिस–या व चौथ्या दुरूस्ती अधिसूचनेनुसार अर्हता व API गुणांकनामध्ये झालेल्या बदलानुसार नवीन मार्गदर्शक तत्वे अंमलात आणणेबाबत.**

ठराव: असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेच्या दि. ११ ऑक्टोंबर, २०१७ च्या बैठकीत बाब क्रं. ७.४ अन्वये पारित झालेला ठराव स्विकारण्यात यावा.

बाब २५: **Proposal for approving the irrevocable Deed of Gift for accepting donation for about 130 Gunthas of prime land, to the University from Prin (Dr.) V.N. Magare and others at free of cost.**

ठराव: It was **resolved** that, the draft of irrevocable Deed of Gift be approved and accordingly the donation of 130 Gunthas of the land in the Survey No.345 at Waghachi Wadi, Talere **be accepted** from donor Prin. (Dr.) V.N. Magare and others. Prin (Dr.) V.N. Magare abstained from the proceeding.

It was further resolved that the resolution be confirmed.

बाब २६: **Minutes of the meeting held on 16th November, 2017 with the Registrar, University Engineer and Additional Metropolitan Commissioner and others of MMRDA regarding handing over plot of 34.715 sq. mtr. land for construction of D.P. road, for consideration.**

ठराव: **It was resolved that**, the minutes of the meeting held on 16th November, 2017 with the Registrar, University Engineer and Additional Metropolitan Commissioner and others of MMRDA regarding handing over plot of 34.715 sq. mtr. land for construction of D.P. road **as per G.R. No. Sankirna 2016/PR.K142/Vishi-2 dated 15th October, 2016, be noted.**

**बाब २७:** **विद्वत परिषद दिनांक दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ च्या बाब क्र. ३.३, ३,१५, ४.१, ४.६, ४.७, ४.१३, ४.१५, ७.१, ७.५ आणि ९.१ वर पारित झालेले ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

AAU

**ठराव:** असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषद दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ च्या बैठकीत बाब क्र. ३.३, ३,१५, ४.१, ४.६, ४.७, ४.१३, ४.१५, ७.१, ७.५ आणि ९.१ या बाबींवर केलेल्या शिफारशी स्विकारण्यात याव्यात.

**बाब २८:** **मुंबई विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचा-यांनी भविष्य निर्वाह निधी विलबांने मिळाल्यामुळे मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या न्यायालयीन याचिका (L)N0.१६२८ OF २०१६ आदेश दिनांक १५ जून २०१७ नूसार विलंब व्याजाची रक्कम अदा करण्याबाबत.**

F&A. Estab (II/IV)

**ठराव:** असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठातील १७ सेवानिवृत्त कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी विलंबाने मिळाल्यामुळे मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका (L) N0.१६२८ OF २०१६ वर मा. उच्च न्यायालयाने दिनांक १५ जून, २०१७ नुसार त्यांना सेवानिवृत्ती दिनांकानंतरचे ३ महिने वगळून प्रत्यक्षात भविष्य निर्वाह निधी मिळालेल्या दिनांकापर्यंत ८% व्याज दराने गणना करून विलंबाची रक्कम अदा करण्यास दिलेले आदेश तसेच सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, यांनी पत्र क्र.सहस/उशि/मु.वि./भ.नि.नि./२०१९/८२ दिनांक १७ ऑक्टोंबर, २०१७ नुसार केलेल्या सुचना विचारात घेऊन विद्यापीठाने उर्वरित विलंबीत व्याजाची रक्कम तातडीने अदा करण्यास मंजुरी देण्यात यावी.

अध्यक्षांचे आभार व्यक्त करुन त्यांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे घोषित करण्यात आले.

SKSawant 07/12/17

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

प्र.कुलगुरू

प्र.प्र-कुलगुरू

प्र. कुलसचिव